MGR|3587 23|7|13
CHE (D.P)

प्रअ/नि/२२ २०१३-१४

Forwarded through e-office vide no. 18153/2013 dt 22/7/13
MC-MGC

P.S. TO MC

शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास 'राखीव वने' म्हणून अधिसूचित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एस-१०/२०१३/प्र.क्र.६४/फ-३.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०१३

उ. न. पा. आयुक्त
प्र. अभि (नि नि)

वाचा :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१२/जमिन/३/मँग्रोव्ह/प्र.क्र.१ (०८-०९)/भाग-३/०३७, दिनांक २१.०२.२०१३.

प्रस्तावना :-

रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ६.१०.२००५ च्या आदेशानुसार राज्यातील कांदळवनाचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी प्रभावी पाऊले उचलण्याचे निदेश दिले होते. त्यानुषंगाने शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास भारतीय वन अधिनियम, १९२७ अनुसार संरक्षित वन म्हणून अधिसूचित करण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

२. राज्यात कांदळवन क्षेत्राची व्याप्ती, कांदळवनांचे पर्यावरणीय महत्व, सुनामी, फयान तसेच चक्रीवादळ सारख्या नैसर्गिक आपत्तीपासून बचाव करण्यासंदर्भात कांदळवनाचे महत्व इत्यादी विचारात घेता उक्त संदर्भान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांनी शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास भारतीय वन अधिनियम, १९२७ अनुसार राखीव वने म्हणून अधिसूचित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. उक्त पार्श्वभूमीवर शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास पुरेसे वैधानिक संरक्षण प्रदान करण्याच्या दृष्टीने त्यास राखीव वने म्हणून गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

३. कांदळवनाचे पर्यावरणीय महत्व विचारात घेता, शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास पुरेसे वैधानिक संरक्षण प्रदान करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१. आतापर्यंत संरक्षित वन म्हणून अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व कांदळवन क्षेत्रास भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील तरतुदींनुसार 'राखीव वने' म्हणून अधिसूचित करण्याबाबत कार्यवाही करावी.

२. यापुढे शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास संरक्षित वनाऐवजी 'राखीव वने' म्हणून अधिसूचित करण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर होतील, याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

( संजीव गौड )
सह सचिव (वने)

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय
19 JUL 2013
समय: ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८
क्रमांक: MC

(कृ.मा.प.)

क्र प्रअ/०१३३८७/ विनि/ साधा० दि. ८/८/१३

प्रत

उपायुक्त परिमंडळ - १/२/३/४/५/६/७

उप प्रमुख अभियंता (वि.नि) १/२

उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर /पू.उप./ प.उप - १/२

सहायक आयुक्त ________ विभाग

कार्यकारी अभियंता (वि.नि) शहर / पूर्व उप. / प.उप. (एच,के) / (पी न आर)

कार्यकारी अभियंता (इ.प्र) शहर १/२/३ / पूर्व उप.- १/२ / प.उप ____

प्रत माहितीकरिता व पुढील कार्यवाहीकरिता सादर

८/८/१३

प्रशासकीय अधिकारी
(विकास नियोजन)-१

८/८/१३